# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission


मविनिआ/आस्था/२०२०/**१२८४** दि.०७ जानेवारी, २०२०

## कार्यालयीन परिपत्रक

सदर परिपत्रकान्वये आपणांस कळविण्यात येते की, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या शासन निर्णय क्र. एसआरव्ही - २०११ / प्र. क्र. २८४ / १२, दि.२१.१०.२०११ मध्ये नमूद केलेल्या तरतूदीच्या अनुषंगाने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या कार्यालयातील सेवेतील अधिकारी आणि कर्मचारी यांची दि.१ जानेवारी आधारभूत दिनांक मानुन संवर्गनिहाय तात्पुरती सेवा जेष्ठतासूची तयार करण्यात आलेली असून सदर संवर्गनिहाय तात्पुरती जेष्ठतासूची आयोगाच्या www.merc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेली आहे.

सदर संवर्गनिहाय तात्पुरत्या सेवा जेष्ठतासूचीमध्ये नमूद केलेली माहिती कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी तपासून सदर सेवा ज्येष्ठतासूची मध्ये जर काही आक्षेप असल्यास, सदर आक्षेप माहिती व तंत्रज्ञान विभागाने तयार केलेल्या ऑनलाईन मॉडेलवर ऑनलाईन पध्दतीने या परिपत्रकाच्या दिनांकापासून १० दिवसांच्या आत नोंदवावा. कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचे आक्षेप प्राप्त न झाल्यास सेवा जेष्ठतासुची मध्ये नमूद केलेला तपशील बरोबर असल्याचे गृहित धरुन संवर्गनिहाय अंतिम सेवा जेष्ठतासूची प्रसिध्द करण्यात येईल.

ABodhare 07/1/2020.

(आरती बोढारे)
उप संचालक (प्रशासन व वित्त)

प्रति,
१) आयोगातील सर्व अधिकारी व कर्मचारी


१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 **Fax :** 022-2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in **Website :** www.merc.gov.in / www.mercindia.org.in